MHSN120006572024

**दाखल दिनांक – १६.०८.२०२४**

**नोंदणी दिनांक – १६.०८.२०२४**

**निकाल दिनांक – ०८.०७.२०२६**

**कालावधी – ०१ वर्ष, १० महिने, २२ दिवस.**

**पलूस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एम.ए.एम.जे. शेख)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३९२/२०२४**

**नि.क्र.**

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र सरकार** तर्फे – पोलीस निरीक्षक,
**भिलवडी पोलीस ठाणे.**

**अभियोग पक्षातर्फे** श्री.आर.आर. चांगण सहा. सरकारी अभियोक्ता.

विरूध्द

**आरोपी** **जयकिशन उदयकुमार माणकापुरे,**
वय – २४ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी,
रा.अमित स्केअर युनिट नं.१, यशवंत लॉन
कळंबा जेल, ता.करवीर, जि.कोल्हापूर.

**आरोपीतर्फे वकील** श्री.आर.एस. मुलाणी.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | १७.०५.२०२४ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ४७/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १६.०८.२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | १६.०८.२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २१.०८.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| युक्तिवाद दिनांक | | ०८.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०८.०७.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीची माहिती

| अनु–क्रमांक | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा– तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेल ी शिक्षा | फौ.प्र. सं.क. ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जयकिशन उदयकुमार माणकापुरे | २१.०५.२०२४ | --- | भा.दं.वि.क. २७९, ३३७, ३३८, ४२७ आणि मो.वा. का.क.१८४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदाराची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | सर्जेराव ज्ञानदेव सुर्वे | १३ सोबत | फिर्यादी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.१७ | वर्दीजबाबावरील सहीपुरती निशाणी . |
| २. | नि.२० | घटनास्थळ पंचनामा आरोपीतर्फे मान्य करण्यात आला. |
| ३. | नि.२१ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीतर्फे मान्य करण्यात आला. |

## – न्यायनिर्णय –

## (घोषणा तारीख– ०८.०७.२०२६)

प्रस्तूतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ या अपराधांसाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत अशी की,**

फिर्यादी सर्जेराव ज्ञानु सुर्वे याने दिनांक १८.०५.२०२४ रोजी फिर्याद देवून असे कथन केले की, दि.१७.०५.२०२४ रोजी सायंकाळी ७–३० वाजताच्या सुमारास आष्टा येथून त्यांचा मित्र संजय जगताप यांच्यासोबत एक बैल घेवून आणणेकरिता त्यांचा छोटा हत्ती क्र.एम.एच.०९–बी.सी.९८६२ ने खंडोबाचीवाडी येथे जात असताना आष्टा ते तासगांव रोडवर अंकलखोप येथे नवीन पाण्याच्या टाकीजवळ वळणावर आले असता आष्टाकडे जाणा–या इनोवा कार क्र.एम.एच.०४–एफ.एफ.१३११ ने भरधाव वेगाने त्यांच्या वाहनास समोरुन जोराची धडक दिली त्यामुळे त्यांचे वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या सुरक्षा गार्डला धडकले व समोरील बाजुचे नुकसान झाले. त्याला डोक्याला व पायाच्या घोट्याजवळ व मांडीस जखम झाली होती व उजव्या पायाच्या मांडीस फ्रॅक्चर झाले होते व त्याचा मित्र संजय यास किरकोळ जखम झाली होती. सदरची इनोवा आरोपी चालवित असल्यामुळे त्याचेविरोधात प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ४७/२०२४ ने नोंदविली व सदर गुन्ह्याचा तपास तपासी अधिकारी यांनी करुन तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर भा.दं.वि.सं. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.१३) ठेवून तो

त्यांना वाचून दाखवला असता त्यांनी त्यांचेवरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली आहे. सुनावणी दरम्यान फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालेबाबत संयुक्तिक पुरसिस (निशाणी क्र.१६) दिली आहे. अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन वगळण्यात आले.

५. सन्माननीय सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे सन्माननीय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

६. अभिलेख, पुरावे व उभयबाजूंचा युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दि.१७.०५.२०२४ रोजी १९–३० वाजण्याच्या दरम्यान तासगांव आष्टा रोडवर, अंकलखोप, ता.पलूस, जि.सांगली येथे आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र.एम.एच.०४–एफ.एफ.१३११ हे मानवी जीवन धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तिला दुखापत पोहचेल इतक्या भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवले व त्याअन्वये आरोपीने भा.दं.वि.चे कलम २७९ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| **२.** | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपणे व हयगयीने चालवून छोटा हत्ती वाहन क्र.एम.एच.०९–बी.सी.९८६२ वरील फिर्यादी सर्जेराव ज्ञानदेव सुर्वे आणि साक्षीदार संजय यांना | **नकारार्थी...** |

| | | |
|---|---|---|
| | धडक देवून दुखापत केली व त्याअन्वये आरोपीने भा.दं.वि.चे कलम ३३७ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| ३. | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे निष्काळजीपणे व हयगयीने चालवून वर नमुद वाहनावरील फिर्यादी सर्जेराव ज्ञानदेव सुर्वे आणि साक्षीदार संजय यांना गंभीर दुखापत केली व त्याअन्वये आरोपीने भा.दं.वि.चे कलम ३३८ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ४. | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून फिर्यादीच्या वाहनाचे नुकसान केले व त्याअन्वये आरोपीने भा.दं.वि.चे कलम ४२७ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ५. | उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन भरधाव वेगाने चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवले व त्या अन्वये त्याने मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी...** |
| ६. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

**<u>–कारणमिमांसा–</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ करिता –</u>**

७. आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षास आरोपीने

आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र.एम.एच.०४–एफ.एफ.१३११ हे मानवी जीवन धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तिला दुखापत पोहचेल इतक्या भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवले, छोटा हत्ती वाहन क्र.एम.एच.०९–बी.सी.९८६२ वरील फिर्यादी सर्जेराव ज्ञानदेव सुर्वे आणि साक्षीदार संजय यांना धडक देवून साधी व गंभीर दुखापत केली वाहनाचे नुकसान केले आणि मोटार वाहन कायद्याचे नियमांकडे दुर्लक्ष केले या बाबी सिध्द करणे आवश्यक होते. सदरच्या बाबी सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ सर्जेराव ज्ञानु सुर्वे याने साक्षीपुराव्यादरम्यान असे सांगीतले आहे की, घटना दीडवर्षापूर्वी घडली होती त्यानंतर त्याने पोलीसात तक्रार दाखल केली होती. परंतु, त्याने फिर्यादमधील मजकूर नाकारला असून त्यावर त्याची फक्त सही **निशाणी क्र.१७** असल्याचे मान्य केले आहे. सदर फिर्यादी साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी भारतीय साक्ष कायद्याचे कलम १५४ अन्वये त्याचा उलटतपास घेतला मात्र त्याचे उलटतपासणीतून देखील अभियोग पक्षास सहाय्य करणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही.

८. फिर्यादी साक्षीदार क्र.१ यांनी अभियोगपक्षाच्या कथनेस सहकार्य होईल असा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. स्वतः फिर्यादीनेच अभियोगपक्षाच्या कथनेस समर्थन केलेले नाही. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष न दिल्याने व घटनेबाबत काहीही कथन केले नसल्याने सहाय्यक सरकारी वकीलांनी भारतीय साक्ष कायद्याचे कलम १५४ अन्वये प्रश्न विचारले परंतु आरोपीवरील गुन्हा शाबीत होईल असे कोणतेही कथन पटलावर आले नाही.

९. अशा परिस्थितीत, फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन ख–या अर्थाने गुन्हा सिध्द झालेले नाही. त्यामुळे, फिर्यादी साक्षीदार क्र.१ याचा साक्षीपुरावा विश्वासार्ह ठरत नाही व आरोपीविरुध्द गुन्हा ग्राह्य धरता येणार नाही. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा **निशाणी क्र.२०** आणि जखमीचे वैद्यकीय

प्रमाणपत्र **निशाणी क्र.२१** असे मान्य करण्यात आले असले तरीही आरोपीनेच गुन्हा केला ही बाब सिध्द झाल्याचे ग्राह्य धरता येणार नाही. फिर्यादीने त्यांच्या साक्षीपुराव्यादरम्यान प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर **निशाणी क्र.१६** प्रमाणे तडजोड झाली असल्याचे देखील मान्य केले.

**१०.** आरोपीविरुध्द कोणताही दोषदर्शक असा पुरावा पटलावर आलेला नाही. आरोपीवर ठेवलेले आरोप निःशंखपणे सिध्द करण्याकरिता आवश्यक असणारा सबळ, ठोस व स्वतंत्र असा साक्षीपुरावा अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला नाही. कथित घटना व त्यामधील आरोपीचा दोषदर्शक सहभाग निःशंखपणे सिध्द होत नाही. फिर्याद व त्यातील अभियोग पक्षाचे कथन सिध्द झालेले नाही. आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र.एम.एच.०४–एफ.एफ.१३११ हे मानवी जीवन धोक्यात येईल किंवा कोणत्याही व्यक्तिला दुखापत पोहचेल इतक्या भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवले, छोटा हत्ती वाहन क्र.एम.एच.०९–बी.सी.९८६२ वरील फिर्यादी सर्जेराव ज्ञानदेव सुर्वे आणि साक्षीदार संजय यांना धडक देवून साधी व गंभीर दुखापत केली वाहनाचे नुकसान केले आणि मोटार वाहन कायद्याचे नियमांकडे दुर्लक्ष केले या सर्व बाबी अभियोग पक्षाने निःशंखपणे सिध्द केलेल्या नाहीत. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.६ बाबत :–**

**११.** उपरोक्त चर्चेवरुन व मुद्दा क्र.१ ते ५ वरील माझ्या नकारार्थी निष्कर्षावरुन असे निष्पन्न होते की, अभियोगपक्षाने आरोपीवर ठेवलेले दोषारोप निःशंखपणे सिध्द केलेले नाहीत. करीता, आरोपी हा प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष सुटण्यास पात्र ठरतो. अंततः, मुद्दा क्र.६ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. आरोपी जयकिशन उदयकुमार माणकापुरे याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५ (१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ आणि ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ या आरोपांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अंतर्गत वैयक्तीक जातमुचलका व बंधपत्र र.रु.१५,०००/– चे न्यायालयात सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.07.08 15:27:08 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दिनांक ०८.०७.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस.**

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, C.J.J.D. & J.M.F.C., Palus, Dist.Sangli. |
| Date | : | 08.07.2026 |
| Judgment signed by the Presiding officer on | : | 08.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 08.07.2026 |